# भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)
## (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे)

जा.क्र. गमा/कावि/०२/२०२०
दिनांक ०८/०९/२०२०

मौजे- पिंप्रीसद्दोदीन, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील ग.नं.१५४ पै. भू.क्र.४ क्षेत्र ७७० चौ.मी. यामधील रहिवास प्रयोजनार्थ इमारत बांधकाम नकाशांना सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांनी पत्र क्र. जा.क्र.बांप/मौ.पिंप्रीसद्दोदीन, ता.इगतपुरी/ग.नं.१५४/संसना/२१९०, दि.२८/०७/२०१७ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे व त्याप्रमाणे बांधकाम नकाशांना उपविभागीय अधिकारी इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांनी पत्र क्र. जमाबंदी/बां.प.एस.आर./०१/२०१८, दि.२३/०२/२०१८ अन्वये बांधकाम आराखडयास मंजूरी प्रदान केलेली आहे. अर्जदार यांनी मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण केलेनंतर इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

अर्जदार यांनी बांधकाम पुर्ण झाल्याबद्दलचा दि. २७/११/२०१९ रोजीचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांचे कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावासोबत वास्तुविशारद आर्कि.उमेश बागुल यांचे सदर बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे पूर्ण झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर आहे. त्याप्रमाणे सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक या कार्यालयातील सहायक नगर रचनाकार, यांचेकडून दि.०९/१२/२०१९ रोजी बांधकामाची तपासणी केलेली आहे. सदर तपासणी वेळी, केलेले बांधकाम हे मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे जागेवर पुर्ण केले असल्याचे दिसुन आले आहे.

### बांधकामाचा तपशिल

भोगवटा दाखला अपेक्षिलेल्या ग.नं.१५४, भू.क्र.४, भूखंड क्षेत्र ७७० या वरील रहिवास वापराच्या १२५४.८० चौ.मी. इमारतीचे बांधकाम हे, या कार्यालयाने मंजूर केलेल्या बांधकाम नकाशानुसार केलेले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे इमारतीचे केलेल्या बांधकामास खालील अटीस अधिन राहुन, भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) देण्यात येत आहे.

१. स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन, पुढील, मागील व बाजुची समासिक अंतरामधील जागा कायम खुली ठेवावी.

२. नियोजित बांधकामामध्ये मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे झाल्यास किंवा वापर बदलावयाचा झाल्यास, या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३. नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीने हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालक यांची राहील.

४. विषयांकित जागेत Rain Water Harvesting व Solar Water System कार्यान्वीत करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांनी पत्र जा.क्र.बांप/मौ.पिंप्रीसद्दोदीन, ता.इगतपुरी/ग.नं.१५४/संसना/२१९०, दि.२८/०७/२०१७ अन्वये मंजुरीची शिफारस केलेल्या पत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

( मं.रा.घटे )
**सहायक संचालक, नगर रचना,**
**नाशिक शाखा, नाशिक**

(तेजस बा.चव्हाण)
**उपविभागीय अधिकारी,**
**इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग,नाशिक.**

\\Bende-pc\d\ATP\ATP Shirsath\complition\CC_pimprisado_154_p.no.4.doc-



Scanned by CamScanner

प्रत :-

१. सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक
२. श्री.वेंकटेशनगर डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे श्री.अविनाश मूळचंद गोठी, रा.वैभव सोसायटी, स्टेट बँकेच्या मागे, जुना आग्रा रोड, ता.जि.नाशिक
३. आर्कि.उमेश बागुल, पहिला मजला, पद्म विश्व सेंटर, जुनी पंडीत कॉलनी, नाशिक.
४. ग्रामसेवक, ग्रामपंचायत पिंप्रीसद्रोदीन, ता. इगतपुरी, जि.नाशिक यांना माहितीसाठी व कर आकारणीकरीता अग्रेषित.

Scanned by CamScanner

# उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांचे कार्यालय

ई मेल :- sdoigatpuri.trimbak@gmail.com दूरध्वनी क्र. 0253-2315320

क्र./जमा/कावि/ 02 /२०२०
नाशिक, दिनांक ०८ / ०१/ २०२०

प्रति,
श्री वेंकटेशनगर डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे
संचालक श्री. अविनाश मुळचंद गोठी
रा. वैभव सोसायटी, स्टेट बॅकेच्या मागे,
जुना आग्रारोड, नाशिक

विषय :- भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) मिळणे बाबत ...
मौजे पिंप्रीसद्रोदीन, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथील येथील ग. नं. 154 भूखंड क्र.4 क्षेत्र 770.00 चौ.मी.

संदर्भ :- १. सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक यांचे कडील बांधकाम पुर्णत्व दाखला बाबत जा.क्र. पुर्णत्व दाखला/मौजे गोर्देदुमाला, ता. इगतपुरी, /ग.नं.१५४ पै., ससंनरना/५ दि. ०१/०१/२०२०
२. इकडील कार्यालयाचे बिनशेती आदेश क्र. जमाबंदी/एनएएसआर/३६/२०१०, दि. ३०/०८/२०१०
३. श्री वेंकटेशनगर डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे संचालक श्री. अविनाश मुळचंद गोठी यांचा दि. २६/११/२०१९ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 व महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) अन्वये विषयांकीत मिळकतीस या कार्यालयाचे आदेश क्र **या रहिवास** प्रयोजनार्थ बिनशेती परवानगी देण्यात आली आहे.

सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक यांनी संदर्भ क्रमांक 1 अन्वये मौजे पिंप्रीसद्रोदीन, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथील येथील ग. नं. 154 भूखंड क्र.4 क्षेत्र 770.00 चौ.मी. मधील क्षेत्रास **रहिवास प्रयोजनार्थ** बांधकाम पुर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्र सहायक संचालक, नगररचना नाशिक यांनी त्यांची स्वाक्षरी करुन इकडील कार्यालयास स्वाक्षरीसाठी पाठविण्यात आला आहे.

सहायक संचालक नगररचना नाशिक यांनी केलेल्या शिफारशी नुसार भोगवटा प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत असुन दि. 01/01/2020 रोजीच्या भोगवटा प्रमाणपत्रात नमूद असलेल्या अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील. सोबत स्वाक्षरीत भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) जोडले आहे.

( तेजस बा.चव्हाण )
उपविभागीय अधिकारी,
इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक.

प्रत :- १) सहायक संचालक, नगररचना नाशिक यांचे कडेस माहितीसाठी अग्रेषित
२) तहसिलदार इगतपुरी यांचे कडे माहितीस्तव अग्रेषित

स्वाक्षरीत xxx
( तेजस बा.चव्हाण )
उपविभागीय अधिकारी,
इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक.



Scanned by CamScanner